महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ गुरूवार, दि. २८ ऑगस्ट २०२५ ■

## एकाच अपार्टमेंटच्या २ फ्लॅटमध्ये चोरांनी मारला डल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :** चोरट्यांनी एका अपार्टमेंटमधील दोन फ्लॅटचे कुलूप तोडून रोकड व सोन्याचांदीच्या दागिन्यांसह लाखो रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत काटोल मार्गावरील पुष्पसंध्या अपार्टमेंटमध्ये घडली. या प्रकरणी पोलिसांनी रोशनी प्रविण पांडेच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

२५ ऑगस्टच्या रात्री रोशनी घराला कुलूप लावून पतीसोबत उपचारार्थ मॅक्स रुग्णालयात गेल्या होत्या. त्यांच्या शेजारी राहणारे सुरेश गणपत गोल्हर हे सुद्धा कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. हिच संधी साधून अज्ञात चोरांनी मध्यरात्रीला मुख्य दाराचे कुलूप तोडून रोशनी यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख २० हजार, ५८ ग्रॅम सोने आणि २०० ग्रॅम चांदीचे दागिने चोरी केले.

त्यानंतर चोरट्यांनी गोल्हर यांच्या घराकडे मोर्चा वळवला. दाराचे कुलूप आणि कडीकोंडा तोडून आत प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटात ठेवलेली १५ हजारांची रोकड, ९० ग्रॅम सोने आणि ५० ग्रॅम चांदीचे दागिने चोरी केले. दुसऱ्या दिवशी दुपारी २ च्या सुमारास रोशनी घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले.

याच दरम्यान गोल्हर यांच्या घराचे कुलूपही तुटलेले आढळले. दोन्ही घरून चोरी झालेल्या सोन्याची किंमत १४ लाखांहून अधिक आहे. पोलिसांनी दोन्ही घरून चोरी झालेल्या मालाची एकूण किंमत ७.८७ लाख रुपये लावली आहे. आरोपींचा शोध सुरू आहे.

## ५० असामाजिक तत्वांची नागपूर शहराबाहेर हकालपट्टी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :** परिमंडळ २ अंतर्गत गिट्टीखदान, धंतोली, सदर, अंबाझरी, सीताबर्डी आणि मानकापूर ठाण्यांतर्गत सणासुदीच्या दिवसांमध्ये कोणतीही अनुचित घटना होऊ नये म्हणून पोलिस उपायुक्त नित्यानंद झा यांनी ५० हून अधिक असामाजिकतत्वांना शहरातून बाहेर हाकलले आहे. यासोबतच प्रत्येक गणेश मंडळाशी समन्वय साधण्यासाठी कर्मचारी नियुक्त करण्यात आला आहे.

माध्यमांशी चर्चा करताना झा यांनी सांगितले की, परिमंडळ दोन अंतर्गत २६९ गणेश मंडळांनी परवानगी घेतली आहे. सर्वांना नियमांचे पालन करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात आली आहे. परिमंडळांतर्गत १५ मोठे गणेश मंडळ आहेत, ज्यांच्या मंडपांमध्ये भाविकांची गर्दी होते. या मंडळांच्या व्यवस्थेकडे विशेष लक्ष ठेवले जात आहे.

प्रत्येक मंडपात पोलिस तैनात करणे शक्य नाही, मात्र मंडळांशी समन्वय आवश्यक आहे. त्यामुळे ३ ते ४ मंडळांचा एक ग्रूप तयार करण्यात आला आहे. यामध्ये पोलिसांसह स्वयंसेवकही व्यवस्था कायम ठेवण्यासाठी काम करतील. यावर्षीपासून गोरेवाडामध्ये तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावातही मूर्तींचे विसर्जन होईल. येथे सुरक्षेची पुरेशी व्यवस्था करण्यात आली आहे. ८ पोलिस निरीक्षक, २६ सहायक पोलिस निरीक्षक/पोलिस उपनिरीक्षक, ११० पुरूष आणि ४९ महिला कर्मचाऱ्यांना बंदोबस्तात तैनात करण्यात आले आहे. त्यांच्या मदतीला २३३ होमगार्ड आणि १ एसआरपीएफची तुकडीही असेल.

सणासुदीच्या काळात कोणतीही अनुचित घटना होऊ नये हाच आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे पोलिसांनी ५० हून अधिक असामाजिकतत्वांना बीएनएसच्या कलम १६३, २ अंतर्गत नोटीस बजावून १३ दिवसांसाठी शहर आणि ग्रामीण क्षेत्रात येण्यास प्रतिबंध लावला आहे. या गुन्हेगारांवर गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यांची नोंद आहे. धंतोलीतून ७, सीताबडीर्तून ६, अंबाझरीतून ११, सदर १७, गिट्टीखदान ४ आणि मानकापुरातून ५ गुन्हेगारांचा समावेश आहे. गणेश मंडपांमध्ये कोणत्याही प्रकारचे गैरकायदेशीर कृत्य होऊ नये म्हणून गत काही दिवसांमध्ये पोलिसांनी १४ गुन्हेगारांना तडीपार केले आहे. सर्व मंडळांना डीजे न लावता मिरवणूक काढण्याची विनंती केली आहे. ध्वनीप्रदूषण कमितकमी व्हावे याकडे लक्ष देण्याची सर्वांची जबाबदारी आहे.

### सामाजिक बांधिलकी अबाधित राखण्यासाठी बैठक

गणेशोत्सवादरम्यानच ईदही येत आहे. या दरम्यान विशेषतः मानकापूर, गिट्टीखदान आणि सदर पोलिस ठाण्यांतर्गत ईदची मिरवणूक निघणार आहे. अशात शहराचे वातावरण बिघडू नये म्हणून आमचा प्रयत्न असेल की, मिरवणूक सायंकाळ होण्यापूर्वीच काढण्यात यावी. गणेश मंडळांच्या प्रतिनिधींशी मिरवणुकीच्या आयोजकांची संयुक्त बैठक घेण्यात आली आहे. सर्वांनी एकमेकांना सहकार्य आणि शांती कायम ठेवण्याचे आश्वासन दिले आहे. तरीही या दरम्यान सर्व मार्गांवर अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात असेल. कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकडे पूर्ण लक्ष ठेवले जाईल. जर काही घडलेच तर पोलिस प्रत्येक परिस्थिती हाताळण्यासाठी तयार आहेत.

## मनपातर्फे गणेशमूर्ती विसर्जनाची चोख व्यवस्था

### शहरात २१६ ठिकाणी ४१९ कृत्रिम तलावांची निर्मिती



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २७ :** आज सर्वत्र मोठ्या उत्साहात गणरायाचे आगमन झाले आहे. नागपूर महानगरपालिकेद्वारा श्री गणेशाच्या स्थापनेपासून तर, मूर्ती विसर्जनापर्यंत शहरातील नागरिकांकरिता विविध सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मनपातर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, शहरात विविध ठिकाणी गणेशमूर्ती विसर्जनाची चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, श्रीमती वैष्णवी बी. आणि अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या मार्गदर्शनात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत श्रीगणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी शहरातील २१६ ठिकाणी ४१९ कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे यंदा मोठ्या गणेश मूर्ती विसर्जनाची गोरेवाडा, कोराडी, कच्छीवीसा येथे सोय करण्यात आली आहे. तर शहरात सोनेगाव, गांधीबाग तलाव परिसरासह विविध ठिकाणी ४१९ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.

मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करीत गणेश मूर्ती कृत्रिम विसर्जन तलावातच विसर्जित करावी असे आवाहन केले आहे.

मनपाद्वारे एक व दीड दिवसीय गणेश विसर्जनासाठी विविध ठिकाणी ३४ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.

यामध्ये लक्ष्मीनगर झोन येथे ३ ठिकाणी, धरमपेठ झोन येथे ७ ठिकाणी, हनुमाननगर झोन येथे २ ठिकाणी आणि धंतोली झोन, नेहरूनगर झोन व सतरंजीपुरा झोन येथे प्रत्येकी एका ठिकाणी अशा एकूण १५ ठिकाणी ३४ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.

याशिवाय तीन दिवसाच्या मूर्तीच्या विसर्जनाकरिता ३७ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये लक्ष्मीनगर झोनमध्ये ३ ठिकाणी, धरमपेठ झोन येथे ७ ठिकाणी, हनुमाननगर झोन येथे ५ ठिकाणी आणि धंतोली झोन, नेहरुनगर झोन, सतरंजीपूरा झोन येथे प्रत्येकी एक अशा १८ ठिकाणी एकूण ३७ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.

पाच दिवसीय श्रीच्या मूर्ती विसर्जनासाठी ६६ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये लक्ष्मीनगर झोनमध्ये ३ ठिकाणी, धरमपेठ झोन येथे १३ ठिकाणी, हनुमाननगर झोन येथे ५ ठिकाणी आणि धंतोली झोन, नेहरुनगर झोन, सतरंजीपूरा झोन आणि आशीनगर झोनमध्ये प्रत्येकी १ अशा १८ ठिकाणी एकूण ६६ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.

सातव्या दिवसाच्या श्रीच्या मूर्ती विसर्जनासाठी १०३ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये लक्ष्मीनगर झोनमध्ये ४ ठिकाणी, धरमपेठ झोन येथे २४ ठिकाणी, हनुमाननगर झोन येथे ८ ठिकाणी आणि धंतोली झोन येथे २ ठिकाणी, नेहरुनगर झोन आणि आशीनगर झोन झोनमध्ये प्रत्येकी १ अशा ४० ठिकाणी १०३ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.

तर नवव्या, दहाव्या आणि अकराव्या दिवशी गणपती विसर्जनासाठी ४१९ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये लक्ष्मीनगर झोन येथे २० ठिकाणी धरमपेठ झोन येथे २४? ठिकाणी, हनुमान नगर झोन येथे ३६ ठिकाणी, धंतोली झोन येथे १९ ठिकाणी, नेहरुनगर झोन येथे ३० ठिकाणी गांधीबाग झोन येथे २८ ठिकाणी, सतरंजीपुरा झोन येथे १६ ठिकाणी, लकडगंज झोन १९ ठिकाणी, आशीनगर झोन येथे१२ ठिकाणी, मंगळवारी झोन येथे ११ ठिकाणी आणि कोराडी येथे १ अशा २१६ ठिकाणी ४१९ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.

## दरोडेखोर ईरानी टोळी गजाआड

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :** पारडी पोलिसांनी ठाण्यांतर्गत ट्रक चालकाला लुटणाऱ्या ईरानी टोळीच्या ४ सदस्यांना २४ तासांच्या आत अटक केली आहे.

शकील खान हसन खान (५७) रा. सिंधी कॅम्प, अकोला, आसिफ अली युसूफ अली (३३), गुलाम परवेज अली दोन्ही रा. बैरागीवाडा, भंडारा आणि आशिक हुसेन निसार अली (४८) रा. रा. ईरानी झोपडपट्टी, अकोला अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. आरोपींवर लुटीचे इतरही गुन्हे नोंद आहेत. भंडाऱ्यात ते ईरानी टोळी म्हणून चर्चित आहेत.

झारखंडच्या सिडेडीह येथील रहिवासी फियार्दी बिरेंद्र यादव (३६) हे ट्रक चालक आहेत. त्यांनी मुंबईत ट्रकमध्ये माल भरला आणि सिल्लीगुडीसाठी निघाले होते. गत २४ ऑगस्टच्या दुपारी नागपूर-जबळपूर महामार्गावर लघुशंका करण्यासाठी त्यांनी ट्रक थांबवला होता. या दरम्यान ६ आरोपी त्यांच्याजवळ आले. चाकूचा धाक दाखवून मारण्याची धमकी दिली आणि जबरीने त्यांच्या खिशातील ७ हजार हिसकावून पसार झाले. यादव यांच्या तक्रारीवरून पारडी पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता आरोपींचा सुगावा लागला. पोलिसांनी वरील चार आरोपींना बेलतरोडी परिसरात आऊटर रिंगरोडवर अटक केली. त्यांचे दोन साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले. ही कारवाई पोनि सुरेश मट्टामी, पोउपनि अरविंद कोल्होर, पोहवा नितीन बोबडे, शैलेष कुंभलकर, संदीप लांडे, सुशील बहिरे, योगेश बोरेकर, निखिल मोहिते, भोजराज, गौरव आणि संदीप ढाले यांनी केली.

### ६१३ वाहन चालकांवर कारवाई

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ६१३ वाहन चालकांवर कारवाई करून ३,४०,५५० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारू बंदी कायद्यान्वये २ व एनडीपीएस कायद्यान्वये एक अशा ३ प्रकरणात ३ आरोपींवर कारवाई करण्यात आली.

## नझुल जमिनींच्या विशेष अभय योजनेला मुदतवाढ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नागपूर आणि अमरावती विभागातील निवासी वापरासाठी दिलेल्या नझुल जमिनींच्या विशेष अभय योजनेला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.

विभागीय आयुक्त नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित समितीने नझुल जमिनींसंदर्भात सर्वंकष अभ्यास करून शासनाला अहवाल सादर केला होता. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार ही मुदतवाढ देण्यात आली आहे. योजनेचा लाभ १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत घेता येईल. विविध कारणांमुळे आतापर्यंत या योजनेत सहभागी होऊ न शकलेल्या भाडेपट्टेदारांना यात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. ही योजना फक्त त्या नझुल जमिनींना लागू राहील ज्या लिलावाद्वारे-प्रिमियम किंवा अन्य प्रकारे भाडेतत्त्वावर निवासी वापरासाठी देण्यात आल्या आहेत. योजना संपल्यानंतर १ ऑगस्ट २०२६ पासून २३ डिसेंबर २०१५ आणि २ मार्च २०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदी लागू होतील.

## पारधी बेड्यावर खड्ड्यात बुडून मूकबधिर मुलाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी काटोल, दि. २७ :** तालुक्यातील खानगाव पारधी वेड्यावर २६ ऑगस्ट सकाळी १० वाजताच्या सुमारास नगरपरिषदेच्या डम्पिंग साइटवरील पावसाच्या पाण्याने भरलेल्या खड्डयात बुडून बारा वर्षीय मूकबधिर मुलाचा मृत्यू झाला.

दरम्यान खड्डयातून त्या मुलाचा मृतदेह काढल्यानंतर त्याची आई कुशीत तो मृतदेह घेऊन बसली होती. मृत मुलाचे नाव विराट राणा पवार असे सांगण्यात आले आहे. काटोल नगर परिषदेने कचरा डम्पिंग साठी मोठमोठे खड्डे खोदले मात्र त्यांची सुरक्षितता किंवा योग्य देखरेख केली नव्हती.



पावसाळ्यात या खड्डयांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आणि परिसर धोकादायक बनला. दरम्यान मंगळवारी सकाळी विराट खेळता खेळता त्या खड्डयात पडला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. अपंगत्वामुळे आधीच संघर्षमय जीवन जगणाऱ्या या मुलाच्या मृत्यूने कुटुंबाचे दुःख पाहून संपूर्ण परिसर सुन्न झाला. आई माधुरी पवार यांच्यावर दुःखाचा डोंगरच कोसळला.



■ **रामटेक :** *रामटेक विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी आणि त्यांचा मुलगा अनंत (चिन्ना) रेड्डी यांच्या घरी मनसर येथे ५५ वर्षापासून गणपती स्थापनेची परंपरा सुरू आहे. आज गणेश चतुर्थीला रेड्डी यांनी स्वतः बाजारात जावून बाप्पाला घरी आणले आणि विधीवत स्थापना केली.*

## नागपूर जिल्ह्यातील सर्व सीबीएसई शाळांना अनिवार्य सुट्ट्या जाहीर

### सिस्वा संघटनेच्या प्रयत्नांना मोठे यश : शिक्षणाधिकारी गौतम गेडाम यांचे निर्देश



■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २७ :** सीबीएसई स्कूल स्टाफ वेल्फेअर असोसिएशन (सिस्वा) च्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. नागपूर जिल्ह्यातील सर्व सीबीएसई शाळांसह सर्वच प्रकारच्या शाळांना हरतालिका २६ ऑगस्ट ,अनंत चतुर्दशी ६ सप्टेंबर आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन १४ ऑक्टोबर या दिवशी सुट्टी जाहीर करण्याचे निर्देश शिक्षणाधिकारी (माध्यमिक) गौतम गेडाम यांनी जारी केले आहेत.

सिस्वा संघटनेने १९ ऑगस्ट रोजी शिक्षण विभागाकडे या मागणीचे निवेदन सादर केले होते. या निवेदनाचा विचार करून तसेच १४ फेब्रुवारी रोजीच्या दीर्घकालीन सुट्टयांच्या परिपत्रकाचा संदर्भ घेत शिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळांना अनिवार्य सुट्टीबाबत परिपत्रक जारी केले.

यासंदर्भात १२ फेब्रुवारी २०२० रोजी सीबीएसई डेप्युटी सेक्रेटरी ऑफिलिएशन यांच्या स्वाक्षरीसह जिल्हा शिक्षण अधिकारी, नागपूर यांना पाठवलेल्या पत्रात स्पष्ट नमूद करण्यात आले होते की, भारत सरकार तसेच राज्य शासनाचे सर्व नियम त्या राज्यातील सर्व प्रकारच्या शाळांना लागू राहतील. हाच संदर्भ घेऊन सिस्वाच्या मागणीला मान्यता देण्यात आली आहे.शिक्षणाधिकारी गेडाम यांनी दिलेल्या सूचनांनुसार सर्व मंडळ, सर्व व्यवस्थापन व सर्व माध्यमांच्या माध्यमिक शाळांनी परिपत्रकाचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

नागपूर जिल्ह्यातील सर्व सीबीएसई शाळांनी वार्षिक सुट्ट्यांचे वेळापत्रक अंमलात आणणे अनिवार्य आहे. सीबीएसई बायलॉजच्या विविध नियमानुसार जिल्ह्यातील सीबीएसई शाळांवरील अधिकार शिक्षण विभागाकडे सोपवलेले आहेत. या निर्णयामुळे नागपूर जिल्ह्यातील शालेय शिक्षक व विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला असून सिस्वा संघटनेच्या जनआंदोलनाचे हे मोठे यश मानले जात आहे. यावेळी दिपाली डबली, महेश डबली, प्रमोद रेवतकर, विजय नंदनवार उपस्थित होते.

## ब्रिटीश कौन्सिलचा ग्लोबल ॲल्युम्नी अवॉर्ड राजू केंद्रे यांना

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २७ :** ब्रिटीश कौन्सिलने ग्लोबल स्टडी यूके अल्युम्नी अवॉर्ड २०२५ चे विजेते जाहीर केले आहेत. हे पुरस्कार युकेमधून शिक्षण घेतलेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करतात. आपल्या समाजात सकारात्मक बदल घडवणाऱ्या आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देणाऱ्यांचा सत्कार केला जातो. हे पुरस्काराचे अकरावे वर्ष असून या पुरस्कारांसाठी १३० पेक्षा जास्त युके विद्यापीठांमधील १३०० माजी विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते.

२०२५ मध्ये फ्रान्स, भारत, नायजेरिया, पाकिस्तान, तुर्की, अमेरिका यांसारख्या २३ देशांमध्ये राष्ट्रीय स्तरावर पुरस्काराचे कार्यक्रम घेण्यात आले. या जागतिक विजेत्यांमध्ये एकलव्य इंडिया फाउंडेशन व एसओएसचे संस्थापक आणि युनिव्हर्सिटी ऑफ लंडन चे माजी विद्यार्थी राजू केंद्रे यांचा समावेश आहे.

त्यांना सामाजिक कार्य या श्रेणीत हा पुरस्कार मिळाला असून ते या यादीतील एकमेव भारतीय आहेत. या जागतिक पुरस्काराचा सोहळा मे २०२६ मध्ये वरिष्ठ ब्रिटीश कौन्सिल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येणार आहे.



तसेच, मार्च २०२५ मध्ये दिल्लीतील ब्रिटीश कौन्सिलच्या राष्ट्रीय सोहळ्यात त्यांना नॅशनल अल्युम्नी अवॉर्ड प्रदान करण्यात आला होता.

भटक्या आदिवासी समाजातील स्वतःच्या जीवनानुभवातून प्रेरणा घेऊन राजू केंद्रे यांनी ग्रामीण व आदिवासी भागातील पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली करून देण्याचे काम हाती घेतले आहे.

२०१७ मध्ये एकलव्य इंडिया फाउंडेशनची स्थापना झाल्यापासून त्यांनी ५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत जनजागृती व मार्गदर्शन पोहोचवले आहे. दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना शंभर पेक्षा नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यापीठांत प्रवेश मिळवून दिला आहे.

वंचित विद्यार्थ्यांसाठी सात दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधिक शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिल्या आहेत.

## कामाचे आमिष दाखवून अब्रूसह दागिनेही लुटले

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :** एक तासाच्या कामाचे ५०० रुपये देण्याचे आमिष दाखवून एका नराधमाने महिलेची अब्रू लुटली. मुलापासून दडवून ठेवलेले दागिनेही घेऊन फरार झाला. या प्रकरणात आरोपीसंबधी कुठलाच ठाव ठिकाणा नसताना गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीला हुडकून काढले. रजनीशकुमार दुबे (५०) रा. कळमना असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

आरोपी मुळचा रिवा (मध्यप्रदेश) चा आहे. गेल्या ५ वर्षांपासून तो नागपुरात राहातो. तो आचारीचे काम करतो. त्यामुळे लग्नसमारंभ आणि हॉटेलचे ऑर्डर त्याला मिळतात. काही महिन्यांपूर्वी त्याने प्रतापनगर परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये काम केले होते. अलिकडे अपार्टमेंटचे नविनीकरणाचे काम हाती घेण्यात आल्याने सर्व फ्लॅट रिकामे करण्यात आले आहे, याची आरोपीला कल्पना होती. पीडित महिला ५० वर्षांची असून ती साफसफाई, धुणी-भांडी करून उदरनिर्वाह करते. तिला एक मुलगा आहे. मुलगा दारूच्या आहारी गेला असून व्यसनासाठी तो घरातील साहित्यांची विक्री करतो. त्याच्या भीतीने पीडित महिला दागिनेही सोबत ठेवायची. घटनेच्या दिवशी आरोपी रजनिश तिला रस्त्यात भेटला. मी महाराज आहे. भांडी धुण्याचे तासाभराचे काम आहे. यासाठी पाचशे रुपये देईन, असे आमिष दिले.

दुचाकीवर बसवून तिला प्रतापनगर ठाण्याच्या हद्दीत निर्जन अपार्टमेंटमध्ये तो घेवून गेला. पायऱ्यावरच तिच्याशी बळजबरी केली. तिच्या जवळील पर्स हिसकावून पसार झाला. त्यापर्समध्ये सोनसाखळी आणि रोख साडेतीन हजार रुपये होते. पीडित महिला अस्ताव्यस्त अवस्थेत खाली आली. आरडा ओरड केल्यानंतर लोकांची गर्दी झाली. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

## बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ का संदेश



तान्हा पोळा कार्यक्रमात सहभागी झालेल्या सारवी प्रफुल्ल तागडे यांनी उत्कृष्ट पोशाख तसेच बेटी बचाओ, बेटी पढाओ, मग आम्हाला मुली नको, मग आम्हाला आई हवी आहे, आम्हाला पत्नी हवी आहे, मग मुलगी का नको अशा पोस्टर्सद्वारे संदेश दिला.

कन्हान में आयोजित तान्हा पोला कार्यक्रम में शामिल बालिका सारवी प्रफुल्ल तागडे ने उत्कृष्ठ वेशभूषा के साथ ही बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ, गर्ल्स, माँ चाहिए, बहन चाहिए, फिर बेटी कयों नहीं जैसे फलक के जरिए मार्मिक संदेश दिया।

# ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत आरपीएफला मोठे यश

## ३ संशयित आरोपींना अटक



**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

रेल्वे सुरक्षा दल नागपूर विभाग रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सतत विशेष मोहिमा राबवत आहे. ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत, विभागीय सुरक्षा प्रवाशांच्या सामानाची चोरी रोखण्यासाठी आणि आरोपींना पकडण्यासाठी पावले उचलत आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून आयुक्त दीपचंद्र आर्य यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष विभागीय कार्य पथक तयार करण्यात आले आहे.

१७ ऑगस्ट रोजी, ट्रेन क्रमांक १२८०८ समता एक्सप्रेसच्या ट्रेनमधून सुमारे ९ लाख रुपयांच्या वस्तू चोरीला गेल्या. प्रकरणाचे गांभीर्य पाहून विभागीय सुरक्षा आयुक्तांनी तात्काळ दखल घेतली आणि नागपूर विभागाला आदेश दिले. आरपीएफ गोंदिया, गुन्हे गुप्तचर शाखा आणि विशेष गुप्तचर पथकाचे सर्व पोस्ट इन्चार्ज सक्रिय करण्यात आले. २५ ऑगस्टच्या रात्री, सततच्या गस्त आणि देखरेखीदरम्यान, संयुक्त पथकाने गोंदिया रेल्वे स्थानक परिसरात छापा टाकला आणि ३ संशयास्पद व्यक्तींना पकडण्यात आले. चौकशी दरम्यान असमाधानकारक उत्तरे मिळाल्याने, आरोपींना रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. रेल्वे सुरक्षा दल, नागपूर विभाग प्रवाशांच्या सुरक्षेसाठी नेहमीच सज्ज असून,

प्रवासादरम्यान सामान सुरक्षित ठेवा. रेल्वे परिसरात किंवा गाड्यांमध्ये कोणत्याही संशयास्पद हालचाली किंवा व्यक्तीची तक्रार जवळच्या आरपीएफ/जीआरपी पोलिस स्टेशन करा किंवा रेल्वे कर्मचाऱ्यांना कळवा किंवा टोल-फ्री क्रमांक १३९ द्वारे रेल्वे मदत करा, असे आवाहन करण्यात आले आहे .

# २ अट्टल घरफोडे पोलिसांच्या जाळ्यात

## ८.३१ लाखांचा माल जप्त

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

जरीपटका पोलिसांनी दोन घरांचे कुलूप तोडून लाखोंचा माल चोरी करणाऱ्या २ अट्टल घरफोड्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ८.३१ लाखांचा मालही जप्त करण्यात आला आहे. असलम उर्फ आशू अब्दुल शरीफ खान (२४) आणि अरिहंत उर्फ गोल्डी विजय गजभिये (१९) दोन्ही रा. अमितनगर, यशोधरानगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

बेझनबागच्या सुदर्शन कॉलनीत राहणाऱ्या फिर्यादी चंदा अर्जुन खरे (५५) ही महिला गत ९ ऑगस्टच्या सायंकाळी घराला कुलूप लावून रक्षाबंधनसाठी लकडापूलजवळ राहणाऱ्या भावाकडे गेली होती. या दरम्यान चोरांनी मुख्य दाराचे कुलूव व कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख ५० हजार, ८३ ग्रॅम सोने आणि २ किलो २०० ग्रॅम चांदीचे दागिने चोरून नेले. दुसऱ्या दिवशी चंदा घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांच्या तक्रारीवरून जरीपटका पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी असलम आणि गोल्डी यांना ताब्यात घेत चौकशी केली असता त्यांनी खरे यांच्या घरी चोरीची कबुली दिली. दोघांनाही अटक करून पोलिस कोठडीत सखोल चौकशी केली असता आरोपींनी कपिलनगर ठाण्यांतर्गत अंगुलीमालनगरातही उमाशंकर विश्वकर्मा यांच्याकडे घरफोडीची माहिती दिली. पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून २ मोबाईल फोन, दुचाकी वाहन, सोन्याचांदीचे दागिने असा एकूण ८.३१ लाख रुपयांचा माल जप्त केला आहे. ही कारवाई वपोनि अरुण क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनात सपोनि आशिष मोरघडे, शशिकांत तायडे व त्यांच्या पथकाने केली.



रामटेक विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार डी.मल्लिकार्जुन रेड्डी आणि त्यांचा मुलगा अनंत (चिन्ना) रेड्डी यांच्या घरी मनसर येथे ५५ वर्षा पासुन गणपती स्थापनेची परंपरा

# डिंगडोह येथे इनडोअर टर्फ क्रिकेट स्टेडियम तयार करा

## भाजपची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**हिंगणा, दि. २७ :** एक कदम क्रिडा और स्वास्थ की ओर अंतर्गत डिगडोह भाजपच्यावतिने राजगृह नगरात इनडोअर टॅर्फ क्रिकेट स्टेडियम तयार करण्याची मागणी मुख्याधिकारी रामेश्वर पंडागळे यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली. आमदार समीर मेघे यांच्या संकल्पनेतुन डिगडोह शहर अंतर्गत राजगृह नगरातील खुल्या मैदानात आंतरराष्ट्रीय दर्जाचे इनडोअर क्रिकेट टफर्फ तयार करून देण्याची मागणी करण्यात आली. या प्रस्तावित टफर्फमुळे डिगडोह शहरातील तरुण आणि युवकांना अत्यंत कमी आणि माफक दरात क्रिकेटचा सराव करण्याबरोबरच भावी खेळाडू तयार होण्यास मदत होईल.

त्याचप्रमाणे डिगडोह शहरामधील नागरिकांच्या सोयी साठी अत्यंत कमी दरामध्ये किंवा गरजेनुसार निशुल्क शववाहिनी (स्वर्गरथ) उपलब्ध करून देण्यात यावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली न्न दोनही मागण्या मान्य करून तत्काळ अंमलबजावणी करण्याचे आश्वासन मुख्याधिकारी पंडागळे यांनी दिले. याप्रसंगी माजी जिप सदस्य अंबादास उके, सुरेश काळबांडे, विनोद ठाकरे, कैलाश गिरी, अनिल शर्मा, महेश लोखंडे, चेतनलाल पांडे, राजेश बोरकर, राकेश उमाळे, प्रदिप कोटगुले, रोहीत शिंगणे, अक्षय वाल्मिक उपस्थित होते.

# जागतिक बंधुत्व दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबीर

**महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. २७ :**

येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यापीठाच्या सद्भावना भवनात एक दिवसीय रक्तदान शिबिर घेण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिष हिवरकर, वाहतूक विभाग निरीक्षक सुनंदाताई देशमुख, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद ठाकूर, रनाळा सरपंच पंकज साबळे, पत्रकार सुदाम राखडे, जीवन तरंग असोसिएशनचे अध्यक्ष उमेश मस्के, भाजप युवा नेता चेतन खडसे, रुची ॲग्रो फार्मचे संचालक राम ठाकूर, पराग सपाटे, वंदना चकोले उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. बी.के. प्रेमलता दीदी यांनी महारक्तदान मोहिमेची माहिती दिली.

संस्थेच्या माजी मुख्य प्रशासक दादी प्रकाशमणी यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त देशभरात ही रक्तदान मोहीम आयोजित करण्यात आली होती.

ब्रह्माकुमारींच्या समाजसेवा विभागाने देशभरात १ लाख युनिट रक्तदान करण्याचे लक्ष्य ठेवले असल्याचे त्यांनी सांगितले.

मनिष हिवरकर म्हणाले की, रक्तदान गरजू व्यक्तीला जीवनदान देते. आज ब्रह्माकुमारी संस्था सर्व प्रकारच्या सामाजिक सेवांमध्ये आघाडीवर आहे आणि सकारात्मक ऊर्जा वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. या मोहिमेत कामठी ब्रह्माकुमारी सेवा केंद्राने एकूण ७४ युनिट रक्तदान केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सुपर स्पेशालिटी वैद्यकीय रुग्णालय नागपूरच्या डॉ. अंकिता कोल्हे तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या पथकाने रक्तदात्यांची तपासणी केली. कार्यक्रमाचे संचालन बी. के. चंद्रकला दीदी यांनी केले तर पो-लीस पाटील वंदना चकोले यांनी आभार मानले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी घनश्याम चकोले, पराग सपाटे, प्रणय राकडे, कामरान जाफरी, राहुल शेळके, रकीब भाई, दीपक अग्रवाल, महेश अग्रवाल, शेषराव अधाऊ, नागोरवजी साबडे, खोजेंद्र माकडे आदींनी परिश्रम घेतले.

# इतवारीतील सैतवाळ जैन मंदिरात पर्युषण पर्वाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

इतवारी शहीद चौक भगवान पार्श्वनाथस्वामी मार्गातील श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन सैतवाळ मंदिरात पर्युषण पर्वाचे गुरुवार २८ ऑगस्ट ते सोमवार ८ सप्टेंबरपर्यंत विविध धार्मिक आयोजनाची माहिती मंदिराचे अध्यक्ष दिलीप राखे, महामंत्री सुधीर सिनगारे यांनी दिली आहे. दररोज सकाळी दशलक्षण व्रत पूजन, सोळाकारण व्रत पूजन, पंचमेरू व्रत पूजन, श्री चंद्रप्रभू व्रत पूजन, रास पंचमी, व्रत पूजन होईल. शनिवार ३० ऑगस्टला रात्री आठ वाजता श्रुतसागरजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त पूजन होईल.

रात्री साडे आठ वाजता भक्ती संध्या होईल, संयोजक ऋषभ आगरकर आहे. रविवार ३१ ऑगस्टला दुपारी एक वाजता भक्तामर महामंडळ विधान होईल. सोमवार १ सप्टेंबरला रात्री साडे आठ वाजता पंचमेरू विसर्जन होईल. शनिवार ६ सप्टेंबरला दुपारी बारा वाजता श्री सम्मेद शिखरजी महामंडळ विधान होईल.

जैन धर्माचे बारावे तीर्थंकर वासुपूज्य भगवंतांना निर्वाण लाडू अर्पित करण्यात येईल. सायंकाळी पाच वाजता अनंत व्रत व दशलक्षण व्रताची समाप्ती होईल.

रात्री आठ वाजता भजन संध्या होईल, संयोजक ऋषभ आगरकर आहे.

रविवार ७ सप्टेंबरला सकाळी दहा वाजता अभिषेक, पुण्याहवाचन होईल.

सोमवार ८ सप्टेंबरला सकाळी नऊ वाजता सर्व जिनबिंबांचा एकशे आठ कलशाने अभिषेक, फुलमाळ, आरती होईल. सायंकाळी साडे सात वाजता क्षमवाणी फुलमाळ, आरती होईल. समाजातील सदस्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन आनंदराव नखाते, मनीष पिंजरकर, अनंतराव शिवणकर, विलास गिल्लरकर, ऋषभ आगरकर, जितेंद्र गडेकर, प्रशांत मानेकर, नरेश मचाले, दिनेश सावळकर यांनी केले आहे.

# पुरातन मंदिराचे जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा



**महासागर प्रतिनिधी, कुही, दि. २७ :**

तालुक्यातील मांढळ येथे घुमडवार चौकातील श्री शिव हनुमान मंदिराचे नव्याने जीर्णोद्धार व शिवपिंड, नंदी व इतर मुर्त्यांची प्राणप्रतिष्ठा वैदिक पद्धतीने मंत्रोच्चारणात असंख्य भाविकांच्या उपस्थितीत पार पडली. सदर मंदिर फार पुरातन असून मागील काही वर्षांपासून पडक्या अवस्थेत होते. मंदिरातील मुर्त्या तुटलेल्या व भंग पावलेल्या होत्या. मागील तीन पिढ्यांपासून घुमडवार कुटुंबीय मंदिरातील पूजा अर्चना पार पाडायचे. मंदिर पडल्याने त्याचा जिर्णोद्धार व्हावा, म्हणून प्रदीप घुमडवार यांनी पुढाकार घेत परिसरातील सर्व कुटुंबीयांच्या सहकार्याने मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण केला.

नागपूर येथील अनुसंधान वेद विद्यालयाचे पंडित प्रवीण लिजडे व त्यांचा संघ यांनी वैदिक पद्धतीने व मंत्रोपचाराने भगवान शिवाची लिंगपिंड, नंदी, गणपती, नागदेवता व माँ अन्नपूर्णा मातेची प्राणप्रतिष्ठा करून सर्व मूर्त्या स्थापित करण्यात आल्या. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवात मूर्ती स्थापनेपासून भजनाचा कार्यक्रम करण्यात आला. दुसरे दिवशी सकाळी प्रदीप घुमडवार यांच्या घरून सर्व मूर्त्यांची भजनाच्या गजरात. गावांतील प्रमुख मार्गानी मिरवणूक काढण्यात आली. यानंतर मंदिरात मूर्त्यांची स्थापना करून महाआरती करण्यात आली. नंतर संध्याकाळी हजारो नागरिकांना महाप्रसाद वितरित करण्यात आला. प्रसंगी कौसल्या व प्रदीप घुमडवार, मोनिका व प्रशांत कलेवार हे यजमान होते. सोबतच प्रिया व सतीश गोंदेवार, संगीता व संजय घुमडवार व प्रणाली व अजय मनकवडे आदी जोडपी यजमान म्हणून उपस्थित होती.

यावेळी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार राजू पारवे यांनी मंदिरास भेट देऊन भगवान शिवाचा आशीर्वाद घेऊन महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

या सोबतच दीपक डहारे, विनोद तिजारे, मंगेश सेलोकर, शरद डहारे, योगेश कडुकार, हेमा विभूते, दामिनी कावळे, दुर्गा डहारे, अनुसया डहारे, सुषमा ठवकर, ताई डहारे, अरुणा कलेवार, प्रमोद घुमडवार, उल्हास घुमडवार, मनोहर चवळे, दीपक चाचेरकर, राकेश ठवकर, नारायण बुद्धे, मंगेश बुद्धे, विघ्नेश्वर बुद्धे, रुपेश कावळे, मुकेश कावळे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सहकार्य केले.

# आता तिकीट खरेदी करणे झाले आणखी सोपे रेल्वेची डिजिटल तिकीट व्यवस्था



**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागाने प्रवाशांच्या सोयी आणि पारदर्शकता लक्षात घेऊन हे लक्षात घेऊन, तिकीट प्रणाली पूर्णपणे डिजिटल स्वरूपात दिली जात आहे. आता सर्व विभाग प्रमुख रेल्वे स्थानकांच्या तिकीट काउंटरवर डिजिटल पेमेंट सुविधा उपलब्ध आहे. तिकिटे खरेदी करताना भीम-यूपीआय डेबिट/क्रेडिट कार्ड आणि ई-वॉलेट वापरून प्रवासी त्वरित आणि सुरक्षित पेमेंट करू शकतात. यासाठी सर्व तिकीट काउंटरवर क्यूआर कोडची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे रोख व्यवहार सोपे होतील. प्रवाशांच्या अधिक सोयीसाठी, रेल्वेने मोबाईल ॲपवर यूटीएस सुरू केले आहे. अनारक्षित तिकीट बुकिंगची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अ?पद्वारे प्रवासी आता कुठूनही तिकीट बुक करू शकतात, प्रवासी या सुविधेचा लाभ घेवून कधीही तिकिटे बुक करू शकतात, ज्यामुळे स्टेशनवर लांब रांगेत उभे राहण्याचा त्रास वाचेल न्न

डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी विभागात विशेष डिजिटल जागरूकता मोहीम चालवले जात आहे. या अंतर्गत, स्थानकांवर माहिती केंद्रे आणि मदत कक्ष स्थापित करण्यात आले आहेत, जिथे प्रशिक्षित रेल्वे कर्मचारी प्रवाशांना मोबाईल ॲप्सचा वापर, डिजिटल पेमेंट प्रक्रिया आणि सुरक्षित प्रवास याबद्दल शिक्षित करतील.

वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री. दिलीप कुमार सिंह म्हणाले की, डिजिटल तिकीट प्रणाली प्रवाशांना अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि जलद सेवा प्रदान करण्याच्या दिशेने एक पाऊल ठरणार आहे. रेल्वेचे हे एक मोठे पाऊल आहे. रेल्वेच्या या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांना डिजिटल पेमेंट सिस्टमचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रेल्वेचे हे पाऊल केवळ रेल्वे सेवा अधिक प्रवासी-अनुकूल बनवणार नाही तर डिजिटल इंडिया मोहिमेलाही बळकटी मिळेल.

# पांधन रस्ता चिखलमय ट्रॅक्टर ट्रॉली पलटली



**महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. २७ :**

खंडाळा (घटाटे) येथील पांधन रस्त्याचे खडीकरण करूनही पांधन रस्ता चिखलमय झाल्याने बुधवारी सकाळी १० वाजता ट्रॅक्टर ट्रॉली पलटली यामुळे जीवितहानी झाली नसली तरी शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. तर या चिखलमय पांधन रस्त्यावरून वहिवाट कशी करावी असा शेतकऱ्यांना प्रश्न पडला आहे. खंडाळा (घटाटे) येथील विनायक हटवार यांच्या शेतापासून ते रेल्वे लाईन पर्यंत दोन किलोमीटरचा पांधन रस्त्याचे २०२२ ला मातीकरण करण्यात आले होते. तब्बल तीन वर्षानंतर चार महिन्यापूर्वी या पांधन रस्त्यावर मुरूम टाकण्यात आला. मुरूम टाकल्यानंतर त्यावर पाणी टाकून रोड रोलर चालवून मुरूम दाबण्याची आवश्यकता असताना पाणी न टाकताच रोड रोलर ने मुरूम दाबल्यामुळे मुरूम व्यवस्थित दाबल्या गेला नाही परिणामी हा रस्ता पुन्हा चिखलमय झाला आहे. या संबंधात खंडाळा (घटाटे) उपसरपंच चेतन कुंभलकर यांनी संबंधित कंत्राटदार प्रीतम गुप्ता यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला पण प्रतिसाद देत नसल्याचे कुंभलकर यांनी सांगितले.

पांधन रस्ते तयार करण्यात रामटेक विधानसभा आघाडीवर असल्याचा व सहाशे किलोमीटर पांधन रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे तर सदर पांधन रस्ता डांबरीकरणापासून वंचित कसा असा प्रश्न त्रस्त शेतकरी करीत आहेत.

# प्लाटफ फार्म वर्कर्ससाठी विशेष नोंदणी मोहीम

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

नीती आयोगानुसार वेगाने वाढणाऱ्या भारतातील प्लाटफ फार्म वर्कर्सना सामाजिक संरक्षण देण्याची गरज ओळखून सामाजिक सुरक्षा कवच वाढवण्यासाठी प्लॉटफ फार्म कामगारांची नोंदणी व नोंदीत कामगारांना ओळखपत्रे जारी करण्यात येणार आहेत.

आयुष्यमान भारत अंतर्गत केंद्रीय अर्थसंकल्पीय तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी २५ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या सहकार्याने नोंदणी वाढवण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

विशेष मोहीमेत प्लाटफ फार्म कामगाराच्या नोंदणीबाबत संबंधीत आस्थापना मालकांनी सहकार्य करण्याचे आवाहन अपर कामगार आयुक्त कि. वि. दहिफळकर यांनी केले आहे.

# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संयुक्त सभा

## बौद्ध नेत्यांचा एकतेचा निर्धार!

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

बौद्धगया (बिहार) येथील महाबोधी महाविहार हे जागतिक बौद्ध धरोहरस्थळ असून, ते बौद्ध समाजाच्या अस्तित्वाचा आणि आस्था स्थानाचा केंद्रबिंदू आहे. तथापि, गेल्या काही दशकांपासून या पवित्र स्थळाचे नियंत्रण बौद्ध समाजाऐवजी इतर संस्थांकडे असल्यामुळे, बी.टी. अ?क्ट रद्द करून विहाराचे संपूर्ण नियंत्रण बौद्ध समाजाला मिळावे, या मागणीसाठी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन दीर्घकाळपासून सुरू आहे.

२०२५ च्या मे महिन्यात या आंदोलनाला नवी चळवळीची दिशा मिळाली आणि महाराष्ट्र ते बिहारपर्यंत हजारो बौद्ध अनुयायांनी रस्त्यावर उतरून आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. तथापि, काही मतभेदांमुळे चळवळीत फूट पडली होती. मा. आकाश लामा आणि मा. भन्ते विनायाचार्य यांचे स्वतंत्र गट तयार झाले होते आणि यामुळे आंदोलनाची ताकद कमी झाली होती.

परंतु आता, या दोन्ही बौद्ध नेत्यांनी आपले मतभेद बाजूला ठेवून पुन्हा एकत्र येण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

यासाठी एक महत्त्वपूर्ण संयुक्त सभा रविवार ३१ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता, दीक्षाभूमी, नागपूरच्या ऑडिटोरियममध्ये आयोजित करण्यात आली आहे. या सभेच्या अध्यक्षस्थानी धम्मगुरु भदन्त आर्य नागार्जुन सुराई ससाई हे असणार आहेत. या वेळी आकाश लामा आणि भन्ते विनायाचार्य सार्वजनिकरित्या एकतेचा संदेश देऊन, नव्या उमेदीने व संघटित पद्धतीने आंदोलनाला नवी दिशा देणार आहेत.

बौद्ध अनुयायी, उपासक-उपासिका, प्रबुद्ध नागरिक यांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रकाशनाथ पाटणकर, मुरलीधर मेश्राम, बाळू घरडे, दीपक वासे, आनंद चवरे, ॲड. विलास राऊत, इंजि संजय इंगळे, देवानंद पानतावणे, राहुल मेश्राम, भुपेश कांबळे, मुकुंद पाटील, शुभम घरडे,पुष्पाताई बौध्द, संगीता पाटणकर,भारती साहारे, पुष्पा घोडके, शोभा घरडे आदिंनी केले आहे.

# ‘अला-बला,महागाई घेऊन जागे मारबतचा



**महासागर प्रतिनिधी कुही, दि. २७ :**

पोळ्याच्या पाडवाला मारबत उत्सव समिती तारणा तर्फे लाल मारबतचे आयोजन करण्यात आले. मंडळाचे हे २८ वे रोप्य महोत्सवी वर्ष असल्याने हर्षोल्लासाने हा उत्सव साजरा करण्यात आला. लोकांचं रक्षण करणारी असे मारबतीचे प्रतीक आहे. संपूर्ण जनतेचे रोगराई अला बला पासून रक्षण करणारी असा मारबती बद्दल पुरातन समज आहे. दरवर्षी पंधरा फूट मूर्ती तयार केल्या जाते. तारणा गावात १९९८ पासून मंडळातर्फे याची सुरुवात करण्यात आली. रोगराई, महामारी, हुंडा प्रथा, लाच, भ्रष्टाचार, घोटाळे, असामाजिक गोष्टी अशा विविध गोष्टींना विरोध दर्शवण्यासाठीही हे प्रतीकात्मक पुतळे तयार करण्यात येते. गावातील व पंचक्रोशीतील हजारो लोक या उत्सवात सहभागी होतात. बँड ढोलच्या जल्लोषात ट्रॅक्टर वर गावात मिरवणुक काढली जाते. सोबत डी जे च्या तालावर तरुणाई बेभान थिरकुन गेली. गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला आला. ‘ईडा पिडा, रोगराई घेऊन जागे मारबत‘ 'पीडा टळो, माशी मोंगसे घेऊन जागे मारबत’ 'यंदा डेंगु, मलेरिया घेऊन जागे मारबत 'अशा विविध विषयावर भाष्य करणारे नारे लावून जल्लोष केला गेला.

तसेच नजीकच्या तारणा महादेव जंगलात मिळणारी ‘मारबत‘ नावाच्या दुमिर्ळ वनस्पतीची फांदी घरोघरी लावत बोजाराही मागितला गेला. ही परंपरा फार पुरातन आहे. अशी अनोखी, पुरातन परंपरा पुढे सुद्धा परंपरागत, उत्साहात व जल्लोषात साजरी केली जाईल असा आशावाद कार्यक्रमाचे आयोजक संपूर्ण कमिटीने दिला. मिरवणुकीनंतर गावाच्या मुख्य चौकात पिवळ्या मारबतीचे दहन करण्यात आले.

# चांपा, कुही फाटा भागात दारूचा महापूर



■ महासागर प्रतिनिधी,
कुही, दि. २७ :
मोहफुलापासून तयार होणारी दारू घातकच असते. या दारूची नशा अधिक चढावी म्हणून यात काही धोकादायक पदार्थांचे मिश्रण केले जाते.

यामुळे या दारूविरोधात प्रशासन नेहमीच कारवाई करीत असते. मात्र कुही पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या चांपा भागात सुरू असलेला दारूचा महापूर नेहमीच चर्चेत असतो. याच महापुराच्या विरोधात अचानक पोलिसांनी कठोर - भूमिका घेत पारधी बेड्यावर धाड टाकून आरोपी ज्ञानेश्वर लालचंद पवार याला अटक केली. याशिवाय त्याच्यासोबत दारू काढण्यासाठी महिला आरोपीही तिथे उपस्थित होत्या.

त्यांच्या विरोधात कुही पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली आहे. चांपा भागात मोठ्या प्रमाणात दारू काढली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी धाड टाकण्याची योजना आखली. सापळा रचून पोलिसांनी पारधी बेड्यावर धाड टाकली. तेव्हा आरोपी ज्ञानेश्वर पवार आणि त्याच्या महिला साथीदार दारू काढण्यात गुंतल्या होत्या. या कारवाईत पोलिसांनी ४८०० लीटर मोहफूल सडवा, ४८ ड्रम दारू आणि इतर नाशवंत माल असा सुमारे २ लाखांचा माल तिथेच नष्ट केला. एवढ्या मोठ्या प्रमाणात मोहफुलापासून दारू काढली जात असल्याचे पाहून पोलिसही चक्रावून गेले होते.

मोहफुलापासून काढलेली दारू ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विकली जाते.

याचे ग्राहक दिवसागणिक वाढत आहे. याचाच गैरफायदा घेत ज्ञानेश्वर पवार याने चांपा भागात अनेक वर्षांपासून आपला अड्डा थाटला होता. यातूनच त्याने लाखों रुपयांची माया गोळा केल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्याच्या विरोधात झालेल्या कारवाईने परिसरातील इतर गुन्हेगार भयभीत झाले आहेत. यापुढेही दारू तस्करांच्या विरोधात कठोर भूमिका घेतली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



## लोककला महोत्सवात शाहिरांचा गौरवपूर्ण सत्कार

# जनजागृती व पंचरंगी संस्थेचे संयुक्तवतीने दमदार आयोजन

**नागपूर, २७ ऑगस्ट :** भांडेवाडी रेल्वे स्टेशन रोड, हनुमाननगर येथे जनजागृती कलंगी शाहिर मंडळ, मोहाडी आणि पंचरंगी निशाण खडी गंमत, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोककला महोत्सव' दिमाखात पार पडला. या प्रसंगी खडी गंमत, डायका, भजन यांसह विविध लोककलांचा मनमोहक आस्वाद रसिकांना मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माणिकराव देशमुख होते. तर माजी नगरसेवक पुरुषोत्तम हजारे, राजकुमार घुले, धनराज अतकरे, पंकज शेळके, व्यंकटराव गजभिये, विनोद राऊत, भरत वहिले, अनिल ठाकरे, सोनबाजी हुलके, सविंद्र चव्हाण, राजू भोयर, सुनील डहाट आणि मुकुंद गेडाम यांची विशेष उपस्थिती लाभली. या महोत्सवात ज्येष्ठ व श्रेष्ठ शाहिरांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. गौरवप्राप्त शाहिरांमध्ये अंबादास नगदेव, विलास कुबडे, चरण शेंडे, सपान राऊत, केशव नारनवरे, संजय मेश्राम, प्रमोद बागडे, गौरीशंकर गजभिये, सचिन कडू व पुरुषोत्तम खांडेकर यांचा समावेश होता.

# दिगंबर जैन समाजाचा दशलक्षण पर्व आज

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २७ :
जैन धर्मात पर्युषण महापर्वाला अत्याधिक महत्व आहे, या पर्वाला दशलक्षण पर्व असेही म्हटल्या जाते. त्याग, संयमाच्या या पर्वात जैन समाजातील छोट्या बालकांपासून वृद्ध व्यक्तींपर्यंत व्रत, उपासना, पूजन, वैकल्यामध्ये व्यस्त असतात. पर्युषण पर्व हा पर्वाचा राजा आहे. सकाळपासूनच मंदिर भक्तांनी फुलून जाते. जैन बांधव वर्षभरापासून या पर्वाची प्रतीक्षा करीत असतात. या पर्वाच्या अंतिम दिनी क्षमावाणी पर्व असतो. सर्व छोटया मुलांपासून मोठ्यांपर्यंत एकमेकांसोबत क्षमायाचना करतात.

श्री सैतवाळ जैन संघटन मंडळ ग्रेट नाग रोड, महावीरनगर नागपूर अंतर्गत श्री महावीर दिगंबर जैन मंदिरात २८ ऑगस्ट ते १४ सप्टेंबरपर्यंत पर्युषण महापर्वात धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले असल्याची माहिती अध्यक्ष चंद्रकांत वेखंडे यांनी दिली आहे. दररोज सकाळी सहा वाजता मूलनायक वेदीवर अभिषेक होईल. सकाळी सात वाजता श्री बाहुबली वेदीवर अभिषेक, सकाळी नऊ वाजता मुलनायक वेदीवर अभिषेक, सकाळी दहा वाजता अनंतनाथ भगवंताच्या वेदीवर अभिषेक, सायंकाळी साडे सहा वाजता आरती, पुष्पांजली, सायंकाळी सात वाजता सामूहिक मेरी भावना, रात्री आठ वाजता पं. विनीत शास्त्री यांचे प्रवचन होईल.

गुरुवार २८ ऑगस्टला सकाळी साडे आठ वाजता राजेंद्र पोहरे यांचे हस्ते ध्वजारोहण केले. रात्री आठ वाजता भक्तितरंग समुधुर भजनांची भक्ती होईल. शुक्रवार २९ ऑगस्टला रात्री आठ वाजता एकल नृत्य स्पर्धा होईल, बाहुबलीनगर दिगंबर जैन पाठशाळेच्या मुलांची अनोखी प्रस्तुती लघु नृत्य नाटिका अनादिनिधन णमोकार महामंत्राची महिमा सादर करतील. शनिवार ३० ऑगस्टला रात्री आठ वाजता भक्ती गीत स्पर्धा होईल. रविवार ३१ ऑगस्टला रात्री आठ वाजता वेशभूषा स्पर्धा होईल. सोमवार ३१ ऑगस्टला रात्री आठ वाजता वेशभूषा स्पर्धा होईल. सोमवार १ सप्टेंबरला रात्री आठ वाजता णमोकार महामंत्र, भक्तामर स्तोत्र स्पर्धा होईल. बुधवार ३ सप्टेंबरला रात्री आठ वाजता जैन सिनियर सिटीझन्स ग्रुपद्वारे गीतांची वारी.. देवाचिये द्वारी हिंदी मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम होईल. गुरुवार ४ सप्टेंबरला सायंकाळी साडे सात वाजता त्याग दिन महोत्सव होईल यात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रमेश तुपकर राहतील. प्रमुख अतिथी पं. विनीत शास्त्री, सुभाष मचाले राहतील. शनिवार ६ सप्टेंबरला दुपारी एक वाजता श्री सम्मेद शिखरजी महामंडळ विधान होईल, वासुपूज्य तीर्थंकरांचा निर्वाण महोत्सव, अनंतनाथ भगवंताचा अभिषेक, रविवार ७ सप्टेंबरला सकाळी आठ वाजता पुण्याहवाचन व क्षमावली होईल. रविवार १४ सप्टेंबरला सकाळी नऊ वाजता सर्व जिनबिंबांचा एकशे आठ कळसाने अभिषेक होईल.

पर्युषण पर्वात सर्व कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन श्री सैतवाळ जैन संघटन मंडळाचे कार्यवाह प्रकाश मारवडकर, सुभाष मचाले, श्रीकांत मानेकर, प्रशांत सवाने, विशाल चाणेकर, भरतेश नखाते, राजेश गडेकर, नीरज पळसापूरे, अमोल भुसारी, पराग पोहरे यांनी केले आहे.

# पिपळ्यात भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन शनिवारी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २७ :
पिपळा येथील सहयाद्री कॉन्व्हेंट ॲन्ड हायस्कूल च्या प्रागंणात भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन कार्यक्रमाचे आयोजन प.पू.प.म. श्री रमनमूनी पातूरकर यांच्या उपस्थितीत शनिवार ३० ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे. सर्वप्रथम सकाळी ९ वाजता मंगलस्नान (उटी),सकाळी ११ वाजता श्री पंचकृष्ण पूजन, दुपारी १२ वाजता गोपाळकाला , दुपारी १ ते सायंकाळी ८ वाजता पर्यंत महाप्रसादाचे वितरण होईल.



कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन माजी सरपंच नरेश भोयर, राजेश भोयर यांनी केले आहे.

# भालोटिया परिवारातर्फे तान्हा पोळ्याचे यशस्वी आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २७ : शहरातील गणेश मंदिरा लगत भालोटिया परिवारातर्फे तान्हा पोळ्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सदर तान्हा पोळा फार पुरातन असून मागील ५५ वर्षापासून त्याचे आयोजन भालोटिया परिवारातर्फे केल्या जाते. या तान्हा पोळ्याची सुरवात कै. बंसीलाल रुढमल भालोटीया यांनी ५५ वर्षापूर्वी केलेली होती. ही परंपरा त्यांचे नातु विजय कुमार भालोटिया यांनी याही वर्षी कायम ठेवत यशस्वीपणे पार पाडली. परिसर पताका, तोरणे व फुग्यांनी आकर्षक सजविण्यात आला. आंब्याच्या डहाळा व केळीच्या खांबाची सुंदर सजावट पाहण्याजोगी होती. शहरातील श्री गणेश मंदिरात गुढीची पूजा करून तान्हा पोळयाची सुरवात करण्यात आली. लहानग्या बाल गोपालांना आकर्षक बक्षिसे व खाऊचे वाटप निखिल भालोटिया यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सर्वश्री परमानंद तुमसरे, आस्तिक सहारे, अजय कुमार भालोटिया, कैलास चौधरी, हरिभाऊ हरडे, पियुष भालोटिया, बंटी भालोटिया, किशन भालोटिया, तसेंच सन्मित्र दुर्गा उत्सव मंडळ गणेश चौक च्या संपूर्ण सदस्यांनी सहकार्य केले.

परंपरागत पुरातन तान्हा पोळा



# हिंगण्यात लल्लुसाई बाबांचा प्रगटदिन व पालखी सोहळा

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २७ :
श्री.लल्लुसाई सार्वजनिक सेवाश्रम, वागदरा येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा श्री. लल्लुसाई बाबांचा प्रगटदिन व पालखी सोहळा आज (दिनांक २८) अतिशय उत्साहात साजरा होणार आहे.तरी सर्व भावीक भक्तांना या सोहळ्यात उपस्थित राहण्याचे आवाहन श्री.लल्लुसाई सार्वजनिक सेवाश्रमाच्या विश्वस्त मंडळाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

हिंगणा तालुक्यात वागधरा इसासनी येथे दरवर्षी मोठ्या भक्तीभावाने साजरा होणारा लल्लूसाई वार्षिक पालखी सोहळा यंदाही थाटामाटात पार पडणार आहे. यंदाच्या सोहळ्यासाठी गावातील सेवाश्रमचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच श्रद्धाळू भक्तगण रात्रंदिवस तयारीत गुंतलेले आहेत. पालखी सोहळ्याचे वेध सर्वत्र लागले असून संपूर्ण परिसर भक्तिमय झाला आहे.

गुरुवारी सर्वप्रथम लल्लुसाई बाबांच्या चरणपादुकासह पालखी सुरेश लारोकर यांच्या निवासस्थानावरुन निघणार आहे.नंतर हिंगणा पोलिसस्टेशन ,हनुमान मंदीर,तिवस्कर वाडी, माळीपुरा,



राममंदीर, जयदुर्गा हाटेल , देवी मंदीर ते वागदरा येथे संपन्न होणार आहे. पालखीसोबत कीर्तन, भजन, सत्संग आणि सामुदायिक पूजा यांद्वारे वातावरणात अध्यात्मिक ऊर्जा निर्माण होणार आहे. यानंतर रायपूर गावातून श्री लल्लूसाईची पालखी यात्रा पारंपरिक वाद्यांच्या गजरात, टाळमृदंग, ढोल-ताशांच्या निनादात आणि 'जय श्री लल्लुसाई'च्या गजरात निघणार आहे.पालखी मार्ग फुलांच्या तोरणांनी सजवण्यात आला असून, मार्गात भक्तांसाठी पाणी, शरबत व प्रसाद यांची सोय करण्यात आली आहे. अनेक ग्रामस्थांनी यात्रेकरूंना सेवा देण्यासाठी स्वयंसेवक पथके स्थापन केली आहेत. महिला मंडळे देखील धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

# संजीवनी सखी संघ तर्फे कन्हान मध्ये संभाषण कौशल्य शिबिर संपन्न




■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. २७ :
संजीवनी सखी संघ जे सतत महिलांच्या प्रगतीसाठी कार्यरत असते त्यांनी कन्हान महिलांसाठी एक संभाषण कौशल्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नेहमी महिलांवर आपल्या कुटुंबाचा भार असतात त्यामुळे असे बरेचसे शिकवण त्यांच्यापासून अलिप्त राहते याला समोर ठेवून संजीवनी सखी संग चे प्रशिक्षक गुणवंत झंजाड सर कल्पनाताई मेश्राम, सुजाता ताई गजभिये व मृणाली ताई यांनी कन्हान च्या महिलांना, बोलताना आत्मविश्वास कसा निर्माण करायचा, प्रभावशाली वकृत्व व निडर नेतृत्व भाषण शैली या प्रमुख केंद्रबिंदूवर हे प्रशिक्षण घेण्यात आले व सोबतच याचे अनुकरण करून प्रशिक्षकांनी एकेक करून स्टेजवर सराव करण्यात आलं. हे आयोजन संजीवनी सखी मंचा तर्फे रमाई सार्वजनिक वाचनालय गणेश नगर कन्हान इथे करण्यात आला होता व या कार्यक्रमाचे अध्यक्ष रमाई वाचनालयाचे संचालक मंडपे गुरुजी होते.

व संजीवनी सखी संघा कन्हान च्या महिला पदाधिकारी दुर्गाताई निकोसे ,प्रतिभा चौरे, अनितताई दुपारे,मला मंडपे , सुजाता नारनवरे, कल्पनाताई फुलझले, दुर्गा गजभिये, वैजयंतीमाला पाटील, ज्योती मोटघरे, पिंकी ताई मेश्राम, नमिता फुललेले, मंदा बागडे ,संगीता ताई खोब्रागडे, उपस्थित होत्या.

# गाडगेबाबांना भारतरत्न देण्याच्या मागणीसाठी तेजस संस्थेचे नागपुरात अधिवेशन

■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. २७ :
संत गाडगेबाबांना भारतरत्न देण्याच्या मागणीसाठी तेजस बहुउद्देशीय संस्थेच्यावतिने २४ ऑगस्ट रोजी नागपूरमधील रवी भवन येथे देशातील धोबी समाजाचे पहिले अधिवेशन आयोजित केले. या कार्यक्रमाला अतिथी म्हणून इंडोरामा कंपनीचे महाव्यवस्थापक संजय सरायकर, वैराग्यमूर्ती पेपरचे संपादक सतीश संबसकर उपस्थित होते.

विदर्भ नेते सीए सुनील चोखारे, ज्येष्ठ काँग्रेस नेते बाबा शेळके, लाड कारंजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ राऊत, ऑल इंडिया जॉइंट ॲडव्होकेट्स फोरम महाराष्ट्र राज्य अध्यक्ष ॲडव्होकेट विलास राऊत, तेजस संस्थेचे वरिष्ठ मार्गदर्शक जगन्नाथ फाले, सामाजिक कार्यकर्ते रामय्या कोतपल्लीवार, नागपूर धोबी झरिया समाजाचे अध्यक्ष छोटू निर्मलकर, माजी नगरसेवक संजय कनोजिया, माजी नगरसेवक श्रावण केझरकर, महाराष्ट्र राज्य भाजपा राज्य सदस्या रजनी लोणारे, सामाजिक कार्यकर्त्या रेखा पाटील,



अमरावती येथील सामाजिक कार्यकर्त्या सुषमा अमृतकर, ग्लोबल इंटरनॅशनल फाउंडेशनच्या अध्यक्षा मनीषा ठाकरे आणि तेजस संघटनेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार यांची उपस्थिती होती .

प्रारंभी गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले न्न चंद्रशेखर अरगुलेवार प्रास्ताविक करताना म्हणाले की, धोबी समाजात एकता नाही. धोबी समाजाचे पाचशे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत आणि त्यापैकी बहुतेक जण सत्तेच्या नशेत आणि राजकीय पक्षांचे गुलाम आहेत. धोबी समाजाची लोकसंख्या १० कोटी आहे. आजपर्यंत गाडगेबाबांना भारतरत्न देण्यात आले नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. संपूर्ण भारतात समाजाला एकत्र येण्याचे आवाहनही अरगुलेवार यांनी केले.

अधिवेशन यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष देविदास पेटारे, सदस्य अर्जुन उपासे, रोशन क्षीरसागर, हंसापुरी नवयुवक बहुउद्देशीय संघटनेचे अध्यक्ष संजय बैसवारे, कैलाश चौधरी, विश्वनाथ राऊत, जय रामटेके, अशोक श्रीवातरी, विनोद बैसवारे, राजकुमार बैसवारे, सुशांत मेश्राम, तेजस अरगुलेवार यांनी परिश्रम घेतले. व्यवस्थापन रोशन क्षीरसागर यांनी केले तर फाले यांनी आभार मानले.

# नवनियुक्त अध्यक्ष अनिल अहिरकर यांचे ढोलताशांच्या गजरात पक्ष कार्यालयात स्वागत




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नागपूर येथील गणेश पेठ कार्यालयात नवनियुक्त शहर अध्यक्ष अनिल अहिरकर व प्रदेश महासचिव तानाजी वनवे यांचे उत्साहपूर्ण आणि भव्य स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाला पक्षाचे विविध विभागातील वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवरांची उपस्थिती होती. स्वागतासाठी फटाक्यांची आतिषबाजी, पुष्पहार, ढोल-ताशांच्या गजरात नवनियुक्त अध्यक्षांचे आणि पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान अनिल अहिरकर यांनी पक्षवाढीसाठी व जनतेच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. नव्या नेतृत्वाचे स्वागत करताना उपस्थितांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

याप्रसंगी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुलभाई पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, तसेच नागपूर जिल्ह्याचे निरीक्षक राजेंद्र जैन यांचे कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर यांनी आभार मानले.

अनिल अहिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष कार्य बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व कार्यकर्त्यांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले. याप्रसंगी महिला अध्यक्षा सुनीता येरणे, युवक अध्यक्ष विशाल खांडेकर,तानाजी वनवे आनंद सिंग लक्ष्मी सावरकर, सोहेल पटेल, बजरंग सिंग परिहार, जानबा मस्के, समीर रहाटे, मालुताई वनवे, माधुरी पालीवार, अमरीश ढोरे, राकेश बोरीकर, अरविंद भाजीपाले, रमेश फुले लक्ष्मीकांत पांडे राजू मिश्रा, निलेश बोरकर अनिता वर्मा, भारती गायधने, ब्रह्मानंद मस्के, अंजुमन शेख, असे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

## दुधबर्वे यांची ग्लोबल कहार समाज चॅरिटेबल ट्रस्टच्या विदर्भ प्रदेश अध्यक्षपदी निवड



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २७ :
दि.१९ ऑगस्ट ला शिर्डी येथे कहार समाज महाअधिवेशन मध्ये ग्लोबल कहार समाज चॅरिटेबल ट्रस्ट च्या विदर्भ प्रदेश अध्यक्षपदी बबलु मनोहर दुधबर्वे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अरविंद तुंबारे यांच्या हस्ते बबलु दुधबर्वे यांना नियुक्ती पत्र तसेच शाल श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संघटनेचे राष्ट्रीय महासचिव सुजित कुमार गौंड, छत्तीसगढ चे आमदार कुवरसिंग निषाद, दिल्ली मत्स्य विकास बोर्ड (कॅबिनेट मंत्री दर्जा) सिताराम बाथम, महामंत्री आर. के. राम,कोषाध्यक्ष पांडुरंग बरे, महाराष्ट राज्य मत्स्य विकास महामंडळ चे अध्यक्ष अशोक बर्वे, नाशिक कहार समाज संघाचे अध्यक्ष कांतीलाल लकारिया,बिड चे आरोग्य निरीक्षक परमेश्वर घूंगासे, बिड कहार समाज संघटनेचे हरिभाऊ विटोरे, नागपूर चे समाजसुधारक किशोर मोरे सह आदी उपस्थीत होते. यावेळी सर्वांचे विशेष आभार बबलु दुधबर्वे यांनी मानले व समाजाचे विविध प्रश्न राष्ट्रीय पातळीपर सोडविण्याचा संकल्प केला.

# चारगाव येथे अमृत वृक्ष लागवडीस उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २७ :
पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर अंतर्गत वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय नागलवाडी (वन्यजीव) द्वारा नागलवाडी परिक्षेत्रातील चारगाव परिसरात '१० कोटी वृक्षारोपण अभियान, अमृत वृक्ष लागवड तथा एक पेड माँ के नाम' या विशेष उपक्रमांतर्गत भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी श्रीलक्ष्मी ए. (मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प), अक्षय गजभिये (उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प), संदीप भारती (सहाय्यक वनसंरक्षक),वनपरिक्षेत्र अधिकारी प्रविण लेले, विष्णू नामदेव सहारे (सरपंच, चारगाव), ईडीसी अध्यक्ष सुधाकर धुर्वे, राजू बर्वे (मुख्याध्यापक, नवेगाव खैरी), साक्षोधन कडबे (मुख्य संयोजक, आम्ही भारतीय व सचिव, आकाशझेप फाउंडेशन) हे प्रामुख्याने उपस्थित होते. या



उपक्रमातून पर्यावरण संवर्धन, जैवविविधता संरक्षण आणि भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवळ निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

एक पेड माँ के नाम या विशेष संकल्पनेतून सहभागी नागरिकांनी आपल्या मातृस्मृतीप्रीत्यर्थ वृक्षारोपण करून भावनिक बंध आणि पर्यावरणीय जबाबदारी एकत्रितपणे जपली. या उपक्रमात स्थानिक ग्रामस्थ सुरेश बगमारे, भगवान गद्रे, शेखर राऊत, पोलीस पाटील वंदना भुर्रे, इको क्लब, राष्ट्रीय आदर्श विद्यालय नवेगाव खैरी येथील निसर्गदूत, शिक्षक दिलीप पवार, अमित मेश्राम, महिला बचतगट, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, इको-डेव्हलपमेंट कमिटी सदस्य तसेच विविध सामाजिक संस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला तसेच इतर मान्यवर, वनाधिकारी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पेंच व्याघ्र प्रकल्पाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, स्थानिक ग्रामस्थ, शाळकरी विद्यार्थी व विविध स्वयंसेवी संस्था यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विघ्नहर्त्याच्या आगमनाला पावसाचे विघ्न

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

दरवर्षीप्रमाणे गणेशचतुर्थीच्या पावन पर्वावर वर्षाऋतुत आगमन होणाऱ्या गणेशाच्या स्वागताची जय्यत तयारी यावर्षीही सर्वत्र दिसून आली. सार्वजनिक मंडळांसाठी व घरगुती गणेशोत्सवासाठी बाजारपेठा विविध रूपातील मूर्ती व आकर्षक सजावटीच्या सामानांनी सजल्या आहेत.

गणेशमूर्तीची स्थापना करण्यासाठी सार्वजनिक गणेश मंडळातील तरुणांनी बँड पथकाच्या साथीने, विविध रंगी फेटे व दुपट्टे धारण करीत, गुलाल उधळत मंगलमूर्ती मोरयाच्या जल्लोषात बाप्पाच्या आगमनाप्रित्यर्थ रॅली आयोजित केल्या होत्या. पण या जल्लोषात दुपारपासून पावसाच्या पडलेल्या कुठे जोरदार तर कुठे रिपरीप सरींनी विघ्न निर्माण केल्याचे चित्र शहरात दिसून आले.

महाराष्ट्रातील गणेशोत्सवाचे स्वरूप हे आता ऐतिहासिक सामाजिक व धार्मिक स्तरावर बदलून हा उत्सव आता एक प्रचंड सार्वजनिक व व्यावसायिक स्वरूपाचा उत्सव बनला आहे. देखावे, मिरवणुका, भव्य सजावट, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांची स्पर्धा या उत्सवात मोठ्या प्रमाणात दिसून येते. विघ्नहर्ता गणेशाची मूर्ती घराघरात व सार्वजनिक मंडळात वाजत गाजत आणण्यापासून नाच गण्याच्या तालमीत गणेशाची स्वागत करण्याची सुद्धा स्पर्धा दिसून येते. पण या भव्यदिव्यतेत पावसाच्या सरींनी मात्र गणेश भक्तांना काही वेळासाठी विघ्नात टाकले. भव्य व महाकाय अशा सार्वजनिक गणेश मूर्ती भंगू नये म्हणून प्लास्टिकने झाकण्यासाठी गणेश मंडळाच्या तरुणांमध्ये घाई गडबड दिसून आली.

हीच अवस्था घरगुती मूर्तींची सुद्धा होती. दुचाकीवर मूर्ती आणणाऱ्यांना मूर्ती झाकून आणताना अवघडल्यासारखे झाले होते तर काहींना झाडांचा व घराचा आसरा घ्यावा लागला. लहानमोठे काही गणेश भक्त रेनकोट मध्ये तर काही छत्रीखाली दिसून आले.

मूर्ती विक्रेत्यांना बाहेर ठेवलेल्या मूर्ती आतल्या भागात आणण्यासाठी धावाधाव करावी लागली. गणेश मूर्तीसाठी प्रसिद्ध असलेल्या इतवारी येथील चितारोळी येथून सार्वजनिक गणेश मूर्ती आणताना पावसामुळे व्यत्यय होऊन चितारोळी ते महाल पर्यंतचा परिसर, सक्करदरा ते रघुजी नगर पर्यंतचा परिसर जाम झाला होता.

अशीच परिस्थिती शहरात इतरत्र दिसून आली. शेतकऱ्यांसाठी व पर्यावरणासाठी उत्तम असलेला पाऊस आजच्या दिवशी मात्र देशभक्तांना निराश करून गेला. पण विघ्नहर्तानें हे विघ्न काही काळानंतर टाळले.



# जरांगेंच्या मुंबईतील आंदोलनाला ओबीसी महासंघ देणार प्रत्युत्तर

## तायवाडेंच्या निवासस्थानी आज होणार महत्वाची बैठक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे झ पाटील यांनी विविध मागण्यांसाठी २९ ऑगस्ट रोजी मुंबईत मोर्चा आणण्याचे जाहीर केल्याने सरकार कोंडीत सापडले आहे.

त्यातच या आंदोलनाला प्रत्युत्तर देण्यासाठी आता राष्ट्रीय ओबीसी महासंघानेही कंबर कसली आहे. महासंघाकडून मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर नागपुरात २८ ऑगस्टला महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईतील आंदोलनाबाबत सरकारची चिंता आणखी वाढली आहे.

मराठा समाजाला ओबीसी संवगार्तून आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या आंदोलनाची राज्यभरात मोठी दखल घेतली गेली आहे. परंतु मराठा समाजाला ओबीसी संवगार्तून आरक्षणाला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचा विरोध आहे. त्यामुळे ओबीसी महासंघाने या मागणीविरोधात थेट प्रत्युत्तर देण्याची भूमिका घेतली आहे.

ओबीसींचे आरक्षण धोक्यात येणार नाही याची हमी सरकारने द्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही महासंघाने दिला आहे. दरम्यान नागपुरातील राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे नेते बबनराव तायवाडे यांच्या निवासस्थानी २८ ऑगस्टला बैठक आयोजित केली गेली आहे. बैठकीला महासंघाचे पदाधिकाऱ्यांसह वेगवेगळ्या भागातील नेतेही सहभागी होतील.

बैठकीत मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा समाजाला ओबीसी संवर्गातून आरक्षणाच्या विषयावर सविस्तर चर्चा केली जाईल. त्यानंतर महासंघाकडून पुढील आंदोलनाची घोषणा केली जाणार असल्याची माहिती राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी दिली.

राजूरकर म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण द्यायचे असल्यास ते त्यांच्या स्वतंत्र श्रेणीत दिले जावे. ओबीसीच्या कोट्यातून आरक्षण देणे कोणत्याही परिस्थितीत मान्य होणार नाही. दरम्यान जरांगेंना परवानगीशिवाय मुंबईत आंदोलन करता येणार नाही.

शासनाने राष्ट्रीय ओबीसी महासंघाद्वारे झालेल्या आंदोलनात मराठा समाजाला ओबीसी संवर्गातून आरक्षण देणार नसल्याची हमी दिली होती. त्यानंतरही आता जरांगे आंदोलन करत आहे. त्यामुळे शासनाने आपल्या भूमिकेवर कायम रहावे, म्हणून हे आंदोलन करणार असल्याचे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी सांगितले.

# वैभवनगरमध्ये तान्हा पोळ्याला बालगोपाळांचा उत्साह शिगेला

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा, दि. २७ :**

वानाडोंगरी नगरपरिषद अंतर्गत शिवमंदीर, वैभवनगर परिसरात वैभवनगर मित्रमंडळाच्या वतीने तान्हा पोळा साजरा झाला.

तान्हा पोळ्यात उपस्थित सर्वांना दरवर्षी उपयोगी साहित्यांचे मंडळाच्या वतीने वितरण करण्यात येते. यावर्षीसुद्धा प्लॅस्टीक प्लेटचे वितरण करण्यात आले. नितेश भारती,अनिल भुते व प्रशांत येवले यांचेकडून कु. स्पर्निका चांदेकर, विवान बोरघरे, सात्त्विका कानडे, रचना माहुरे व वैदेही अड्याळकर यांना बक्षिस देण्यात आले.

गोविंदराव घाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली जगन्नाथ कापसे, किशोर गुरनुले, गणेश वाघे, नितीन पटले, किशोर घाटोळे, सचिन उपरिकर, निलेश मानवटकर, राजेश घाटोळे, हर्षल उपरिकर, सागर चिरुटकर, कृष्णा घाटोळे, नरेश गिरघुसे, राजेश यांनी सहकार्य केले.



अष्टविनायक गणपती मंदिर प्रभाग क्रमांक ६ येथे ताना पोळा साजरा करण्यात आला . विविध वेशभूषेत सहभागी बालगोपाळांना बक्षीस देण्यात आले. याप्रसंगी माजी सभापती वंदना मुंडे, संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य दादाराव मुडे, डॉ. राठी, विजुभाऊ वायके, दिलीप धोटे, राखी, गोटमुकुवार यांच्यासह आयोजन समितीचे पदाधिकारी, सदस्य तसेच गावातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आज राकेशकुमार पोरवाल स्मृतीदिन

■ **महासागर प्रतिनिधी**
**कामठी, दि. २७ :**

सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयात गुरुवार २८ ऑगस्टला राकेश कुमार पोरवाल यांच्या स्मृती दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कामठीचे तहसीलदार गणेश जगदाळे तर प्रमुख पाहुणे म्हणून न. प. मुख्याधिकारी विनोद जाधव, शिक्षण प्रसारक मंडळ कामठीचे अध्यक्ष संजीव कुमार पोरवाल, सीईओ प्राचार्य डॉ .सुधाकर धोंगडे उपस्थीत राहणार आहेत .

प्राचार्य स्वप्नील डहाट, उपप्राचार्य डॉ. रेणु तिवारी, उपप्राचार्य डॉ. मनिष चक्रवर्ती, समन्वयक प्रशांत धोंगडे, प्रा. मोहम्मद असरार, डॉ. विनोद शेंडे, डॉ. निशिता अंबादे, स्वप्नील राठोड आदींनी कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

# महिला सरपंच विरोधात अविश्वास ठराव पारीत

■ **महासागर प्रतिनिधी**
**भिवापूर, दि. २७ :**



तालुक्यातील टाका ग्राम पंचायतीच्या महिला सरपंचाविरुद्ध अविश्वास ठराव पारीत झाला आहे. हा अविश्वास ठराव बहुमताने पारित करण्यात आला. सरपंच यांना १ मत तर त्यांच्या विरोधात ७ मते पडली.

प्राप्त माहितीनुसार, भाजपा समर्थित सरपंच विना बडवाईक यांचेवर विकास कामात अळथळा आणणे, सदस्याला विश्वासात न घेणे, उर्मट वर्तन करणे असे आरोप करीत सदस्यांनी भिवापूर तहसीलदार यांच्याकडे तक्रारीसह अविश्वास प्रस्ताव सादर केला होता.

त्यानुसार मंगळवार २६ ऑगस्ट रोजी तहसीलदार बाबासाहेब टेळे यांच्या उपस्थितीत विशेष सभेचे आयोजन करण्यात आले . अविश्वास प्रस्तावावर मतदान घेतले असता, सरपंच यांच्या बाजूने त्यांचे स्वतःचे एकच मत पडले तर विरोधात ७ मते पडली. यात भाजपा व कॉंग्रेसच्या दोन सदस्यांचा समावेश आहे.

टाका ग्राम पंचायत सरपंच विना वडवाईक या जनतेमधून सरपंच पदाकरीता निवडून आल्याने त्यांना विशेष ग्रामसभेत सिद्ध करावे लागणार आहे. अन्यथा त्यांना सरपंच पद गमवावे लागू शकते.

सभेला सरपंच विना बडवाईक, उपसरपंच त्र्यंबक उमक, सदस्य सचिन धारगावे, नितेश राऊत, माया गेडाम, रंजना बोरकर, अलका डडमल, व शारदा शिवरकर उपस्थित होते.

# पिपळयात भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन शनिवारी

■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २७ :**

पिपळा येथील सहयाद्री कॉन्व्हेंट अॅन्ड हायस्कूलच्या प्रागंणात भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन कार्यक्रमाचे आयोजन प.पू.प.म. रमनमूनी पातूरकर यांच्या उपस्थितीत शनिवार ३० ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे.

सर्वप्रथम सकाळी ९ वाजता मंगलस्नान (उटी),सकाळी ११ वाजता श्री पंचकृष्ण पूजन, दुपारी १२ वाजता गोपाळकाला , दुपारी १ ते सायंकाळी ८ वाजता पर्यंत महाप्रसादाचे वितरण होईल. याशिवाय इतरही धार्मिक कार्यक्रम होतील.



कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन माजी सरपंच नरेश भोयर, राजेश भोयर यांनी केले आहे.

# लुंबिनी नगर मानकापूर येथे तान्हा पोळा

■ **प्रभाग मित्र, नागपूर, दि. २७ :**

लुंबिनी नगर मानकापुर येथे ओबीसी समाजाचे विदर्भ उपाध्यक्ष संजय भिलकर यांच्या अध्यक्षतेखाली तान्हा पोळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला अतिथी म्हणून उपस्थित बहुजन विचार मंचाचे मुख्य संयोजक नरेंद्र जिचकार, मानकापुर पोलीस स्टेशनचे प्रभारी कालसेकर, सामाजिक कार्यकर्ता घनश्याम मांगे, डॉ स्वीटी गायकवाड़ यांच्या हस्ते नंदी बैलाची पुजा करण्यात आली.

पोळ्यात सहभागी बाळगोपाळांना बक्षीस, व खाऊंचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मनोहरे,साखरे, गडपडे, गायकवाड़, पवन राणा, जांभुळकर तसेच लुंबीनी बुध्दविहार समितीच्या मित्र परिवाराने सहकार्य केले. संचालन सुखदेव मनोहरे यांनी केले तर अभिजीत काबंळे यांनी आभार मानले.



# हिंगणा तालुक्यात तान्हा पोळा उत्साहात

■ **प्रभाग मित्र, हिंगणा, दि. २७ :**

बहुजन नगर, लहानुजी महाराज ले आऊट, वागधरा ईसासनी, हिंगना येथे तान्हा पोळा उत्साहात साजरा झाला. दिलीप रामटेके, विक्रांत बोपचे, सतीश अंबुले, सुनील पटले, शिवचरण येडे, रमेश भूरे बोपचे,मुन्ना गौतम, प्रतीक राऊत, गेंदलाल पटले, नितिन पटले, दिलेश्वर चौधरी, धन्नू पाचे, दिनेश दहके आदिंनी कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य केले.



# सन्मार्ग नगरातील बागेची दुरवस्था





महासागर प्रभाग वार्ता

■ **प्रमोद जांभुळकर, नागपूर, दि. २७ :**

प्रभाग क्र. २९ क अंतर्गत सन्मार्ग नगर, बांते लेआउट, हुडकेश्वर रोड परिसरातील एनएमसी गार्डन सध्या अक्षरशः बेवारस अवस्थेत आहे. नागपूर महानगरपालिकेच्या देखरेखीखाली असलेली ही बाग सध्या साफसफाई व देखभालीअभावी उपेक्षित बनली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांत तीव्र नाराजी पसरली आहे.

बागेतील वॉकिंग ट्रॅक उखडलेला, झाडे-झुडपांची अनियंत्रित वाढ, आणि ग्रीन जिमचे मोडकळीस आलेले उपकरणे हे चित्र रोज दिसून येते. बसण्यासाठी ठेवलेली बेंचेस तुटलेल्या अवस्थेत आहेत. अशा अस्वच्छ आणि धोकादायक वातावरणामुळे वृद्ध, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे.




स्थानिक रहिवासी अजय दत्ता यांनी सांगितले, बागेत अस्वच्छता, कीटक आणि झुडपांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्वचा विकारांपासून ते कीटकजन्य त्रासांपर्यंत विविध समस्या भेडसावत आहेत.

या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सुप्रिया दत्ता, सचिन वाघमारे, राजू गुडधे, विश्वजित दत्ता, निलेश घाडगे, मनीष वाघमारे, वैशाली अतकर आणि दीपाली मुतकुरे यांच्यासारख्या स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेत बागेची नियमित स्वच्छता करणे, झाडे व झुडपांची वेळोवेळी छाटणी, ग्रीन जिमचे नूतनीकरण, वॉकिंग ट्रॅकची दुरुस्ती, नवीन व सुरक्षित बसण्याच्या जागांची बेंचेस उभारणी करण्यात यावी, अशा मागण्या महानगरपालिकेकडे लावून धरल्या आहेत.

## नागरिक कमालीचे त्रस्त महानगरपालिकेकडे त्वरित कारवाईची मागणी

परिसरातील नागरिकांची ही मागणी अत्यंत रास्त असून, महापालिकेने तत्काळ हस्तक्षेप करून बागेची स्थिती सुधारावी, अशी ठाम भूमिका घेतली आहे.

# उघडी नाली : आरोग्यास धोका

## तातडीने काम पूर्ण करण्याची नागरिकांची मागणी

■ **प्रभाग मित्र, नागपूर, दि. २७ :**

वाडी टी पॉईंट ते हिंगणा रोडवरील अमेरिकन एन्कोलॉजी नॉगिया स्पेशालिटी हॉस्पिटलजवळ गेल्या अनेक महिन्यांपासून नालीचे काम अर्धवट अवस्थेतच सोडण्यात आले आहे. त्यामुळे घाण पाण्याने भरलेली उघडी नाली सतत वाहत असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे. ही स्थिती स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण करत आहे.

सदर मार्ग हा हिंगणा एमआयडीसीचा मुख्य रस्ता असून दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी आणि रुग्ण या मागार्चा वापर करतात. उघड्या नालीमुळे चालणाऱ्या नागरिकांना अडथळा येत असून, डास, माशा यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे साथीचे आजार पसरण्याची शक्यता वाढली आहे.

नागरिकांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालून नालीचे बांधकाम पूर्ण करण्याची मागणी केली आहे. स्थानिक प्राधिकरणाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी आहे.

